# BK BIRLA CENTRE FOR EDUCATION

**SARALA BIRLA GROUP OF SCHOOLS**
**SENIOR SECONDARY| CO-ED DAY CUM BOYS' RESIDENTIAL SCHOOL**

B K BIRLA CENTRE FOR EDUCATION (Sarala Birla Group of Schools)

INDIAN PUBLIC SCHOOLS' CONFERENCE

## MID-TERM EXAMINATION 2024-25

**MARATHI**

Class :VI
Date : 23.09.2024
Admission No.:

Duration : **3** Hrs
Max. Marks : **80**
Roll No.:

---

उत्तरपत्रिकेसाठी सूचना : –

(1) सूचनेप्रमाणे प्रश्नांची उत्तरे लिहिणे.
(2) खंड – क ,ख, ग, घ नमूद करावेत.
(3) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष दयावे.

---

**[ खंड क वाचन कौषल्य ]**

**प्र 1 अपठित गदयांश –** **(5×1=5)**

एकदा एक शिकारी शिकारीसाठी जंगलात आला. त्याने एक जाळे शेतामध्ये पसरून ठेवले थोडयाच वेळात कबुतरांचा एक थवा आकाशातून उडत तेथे आला. सर्व कबुतरे दाणे टिपण्यासाठी खाली उतरले. आणि सर्वजण जाळयात अडकले होते. कबुतरांच्या प्रमुखाला एक युक्ती सुचली तो सर्वांना म्हणाला जाळयासकट आकाशात उडा. आणि जाळयासह ती कबुतरे दूर उडून गेली आणि वनात इतर प्राण्याच्या मदतीने जाळयातून मुक्त झाली. एकीच्या बळामुळेच हे शक्य झाले .

(1) शिकारी शिकारीसाठी कोठे गेला?

(क) शेतात (ख) वनात (ग) जंगलात

(2) त्याने शेतामध्ये काय पसरून ठेवले?

(क) फळे (ख) जाळे (ग) दाणे

(3) कोणाचा थवा आकाशात उडत होता?

(क) कबुतरांचा (ख) चिमण्यांचा (ग) घारींचा

(4) कबुतरांच्या प्रमुखाला काय सुचली?

(क) कला (ख) विचार (ग) युक्ती

(5) कशाच्या बळामुळे त्याची सुटका झाली?

(क) एकीच्या (ख) नेकीच्या (ग) श्रीमंतीच्या

**प्र 2 अपठित गदयांश –** **(5×1=5)**

चांगले कामे केली म्हणजे मनुष्य स्वर्गात जातो आणि वाईट कृत्ये केली की तो नरकात जातो. अशी आपल्याकडे पूर्वापार आख्यायिका आहे. या स्वर्गाच्या आणि नरकाच्या जागा कोठे असाव्यात त्या संबंधीही काही संकेत सर्वमान्य आहेत. स्वर्ग वर आकाशाच्या पलीकडे कोठेतरी आहे . आणि नरक हा पाताळात असावा असे मानले जाते.चांगल्या कृत्यामुळे स्वर्ग मिळतो व वाईट कर्मामुळे नरकात जावे लागते असा जनमाणसात समज आहे.

प्रश्न–

(1) वाईट कृत्ये केली की मनुष्य कोठे जातो ?

(क) नरकात (ख) गावात (ग) बंगल्यात

(2) चांगले कामे केली म्हणजे मनुष्य कोठे जातो ?

(क) घरात (ख) स्वर्गात (ग) शाळेत

(3) आकाशाच्या पलीकडे काय आहे ?

(क) चांदण्या (ख) चंद्र (ग) स्वर्ग

(4) नरक कोठे आहे ?

(क) धरतीवर (ख) आकाशात (ग) पाताळात

(5) वाईट शब्दासाठी विरूध्दार्थी शब्द आहे ?

(क) चांगला (ख) चांगले (ग) खरे

## खंड ख व्याकरण

**प्र 3 विरुधार्थी शब्द –** ( opposites ) **(2×1=2)**

1 आनंद x ( दुःख / गीत / सुख )

2 खूप x ( जास्त / कमी / वर )

**प्र 4 लिंग बदला –** ( change the gender ) **(2×1=2)**

1 काका ( काकी / मामी / मामा )

2 पिता ( काका / माता / आई )

**प्रश्न 5 वचन बदला –** (write the plural noun ) **(2×1=2)**

1 पंखा ( पंख / पंखे / पंखो )

2 रेष ( रेषा / रेषस / रषा )

**प्र 6 समानार्थी शब्द लिहा–** **(2×1=2)**

1 उत्सव ( सण / दिवाळी / दसरा )

2 दैवत ( राक्षस / मानव / देव )

**प्र 7 काळ ओळखा –** **(2×1=2)**

1 गाडीचा दरवाजा बंद झाला.

2 राम अभ्यास करीत आहे.

**प्र 8 वर प्रत्यय लावून नवीन शब्द बनवा –** **(2×1=2)**

1 पुस्तका + वर =

2 झाडा + वर =

**प्र 9 खालील वाक्यातील क्रियापद ओळखा –** **(2×1=2)**

1 गाडी वेगात जात आहे.

2 राम आंबा खातो

**प्र 10 खालील वाक्यातील सर्वनाम ओळखा :–** **(2×1=2)**

1 मी आंबा खात आहे .

2 मित्राने माझी अभ्यासात मदत केली.

## खंड ग साहित्य

**प्र 11 पठित गदयांश –** **(5×1=5)**

भारतीयांचे आवडते दैवत श्रीकृष्ण होय श्रीकृष्णाला विष्णूचा अवतार समजतात जेथे–जेथे श्रीकृष्णाचे मंदिर असते तेथे तेथे जन्मोत्सव साजरा केला जातो अष्टमीच्या दिवशी सगळे उपवास धरतात रात्री बारा वाजता श्रीकृष्णाचा जन्म झाला . कृष्णाला दही–दूध खूप आवडत असे म्हणूनच नवमीला दही–पोहयाचा प्रसाद करुन वाटतात श्रीकृष्णाच्या आईचे नाव देवकी तर पित्याचे नाव वासुदेव होते. त्याचे पालन पोषण गोकुळात झाले तेथे त्याचे पालन–पोषण यशोदा व नंदबाबाने केले .

प्रश्न

1 भारतीयांचे आवडते दैवत कोणते आहे ?

2 कोणत्या दिवशी सगळे उपवास करतात ?

3 किती वाजता श्रीकृष्णाचा जन्म झाला ?

4 श्रीकृष्णाला काय फार आवडत असे ?

5 नवमीला कशाचा प्रसाद करतात ?

**प्र 12 पठित पदयांश –** **(5×1=5)**

पैल तो गे काऊ कोकताहे।
शकुन गे माये सांगताहे ।।1।।
उड रे उड रे काऊ तुझे सोन्याने मढवीन पाऊ ।
पाहुणे पंढरीरावो घरा कैं येती ।।2।।
दहिभाताची उंडी लावीन तुझे तोंडी ।
जीवा पढिये त्याची गोडी सांग वेगी ।।3।।

1 पैल तीरी कोण कोकताहे ?

2 घरी कोणते पाहुणे येणार आहेत ?

3 कावळयाचे पाय कशाने मढविण्यात येणार आहेत ?

4 कावळयाला काय खायला मिळणार आहे ?

5 हा अभंग कोणी लिहिला आहे ?

**प्र 13 जोडया लावा –** **(4×1=4)**

1 कावळा – डरॉव –डरॉव

2 शेळी – चिवचिव

3 बेडूक – काव–काव

4 चिमणी – बें–बें

**प्र 14 रिकाम्या जागा भरा –** **(4×1=4)**

1 जिकडे जावे तिकडे माझी –––– आहेत.

2 –––– एकापेक्षा एक पराक्रम केले.

3 नव्या मनूतिल नव्या दमाचा –––––– शिपाई आहे.

4 –––– दिवशी सगळे उपवास धरतात.

**प्रश्न 15 कोण कोणास म्हणाले लिहा –** **(2×1=2)**

1 ते खरे रे बाळांनों, पण ही व्यक्ती कोण आहे ?

2 मला फक्त पक्ष्याचा डावा डोळा दिसतोय.

**प्रश्न 16 खालील प्रश्नांची उत्तरे लिहा –** **( कोणतेही सात )** **(7×2=14)**

1 घरच्या खुणा कोणाला सगळीकडे दिसतात ?

2 आंब्याच्या झाडावर कोणता पक्षी बसला आहे ?

3 मगरीला मारून अर्जुनाने कोणाचे प्राण वाचवले ?

4 माईंच्या वाडयाला अवकळा का आली ?

5 अर्जुनाला कोणी शाबासकी दिली ?

6 गोकुळाष्टमी हा सण कशाप्रकारे साजरा करतात ?

7 ज्ञानेश्वराच्या घरी कोणते पाहुणे येणार आहेत ?

8 माईंना कोणकोणते फुले आवडत त्यांची नावे लिहा ?

9 माईंनी शेवटी आपले फुलवेड कसे जपले ?


**प्रश्न 17 आपल्या आवडत्या वस्तूसाठी एक आकर्षक जाहीरात तयार करा –** **(1×5=5)**

**प्रश्न 18 निबंध लेखन :– ( कोणताही एक )** **(1×5=5)**

1 माझी शाळा 2 माझा आवडता खेळ 3 माझा मित्र

**प्र 19 स्वपरिचय लिहा :–** ( my self in marathi ) **(1×5=5)**

**प्र 20 :–चित्र वर्णन –** **(1×5=5)**



——————————————— **समाप्त** ———————————————